जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५९७ दिनांक - ०६/०८/२०२३**

बंडगार्डन पोलीस स्टेशन,पुणे शहर

## संघर्ष ऊर्फ भाव्या नितीन अडसुळ व त्याचे इतर साथीदार यांचे विरुद्ध मकोका अंतर्गत कारवाई.

दि.१७/०७/२०२३ रोजी फिर्यादी हे जेवण झाल्यानंतर मारुती मंदिर परिसर,१३ ताडीवाला रोड, पुणे येथे पायी चालत असताना,फिर्यादी यांचे ओळखीचा इसम नामे संघर्ष उर्फ भाव्या नितीन आडसुळ हा त्याच्या दोन मित्रासोबत गप्पा मारून,तेथुन परत राहते घरी जात असताना,संघर्ष उर्फ भाव्या याने फिर्यादीस तु बाहेर जात आहेस,चल घरी जा असे बोलुन शिवीगाळ केली. त्याबाबत फिर्यादी यांनी त्यास विचारणा केल्याचा राग मनात धरून,संघर्ष उर्फ भाव्या व त्याच्या सोबत असणारे त्याचे दोन साथीदारांनी फिर्यादीचे जवळ येवुन,तुला मस्ती आली आहे का? मला उलट प्रश्न विचारतो का? असे बोलुन संघर्ष उर्फ भाव्या याने त्याचे खिशातील लोखंडी फायटर काढुन,फिर्यादी यांचे कपाळावरती तसेच डोक्यावर जोरात मारून त्यांना जबर दुखापत केली होती. म्हणुन **बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२३२/२०२३,भा.द.वि.कलम ३२६, ३२४,३२३,५०४,५०६,३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचा तपासा दरम्यान सदरचा गुन्हा हा आरोपी नामे **१.संघर्ष उर्फ भाव्या नितीन आडसुळ वय-२१ वर्षे,रा.सारीपुत्त बुध्द विहारा जवळ,नदी किनारी,१३ ताडीवाला रोड,पुणे २.साहील राजु वाघमारे उर्फ खरखर सोन्या,वय २२ वर्षे,रा.सदर ३.अतुल श्रीपाद म्हस्कर उर्फ सोनू परमार,वय-२२,रा. शुरवीर चौक,ताडीवाला रोड,पुणे** यांनी केल्याचे निष्पन्न झाल्याने यातील आरोपी नामे संघर्ष उर्फ भाव्या नितीन आडसुळ याला दि.१८/०७/२०२३ रोजी रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच आरोपी नामे साहील वाघमारे उर्फ खरखर सोन्या याला दिनांक ३०/०७/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच अतुल श्रीपाद म्हस्कर उर्फ सोनू परमार यासही दि.०५/०८/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

वरील नमुद आरोपींकडे सखोल तपास केला असता व नमुद आरोपीचे पुर्व रेकॉर्डची पाहणी करता यातील आरोपी नामे संघर्ष ऊर्फ भाव्या नितीन अडसुळ यांचेविरूध्द ०४ गुन्हे दाखल असुन,त्याने साहील राजु वाघमारे उर्फ खरखर सोन्या व अतुल श्रीपाद म्हस्कर उर्फ सोनू परमार यांचेसह संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असुन,सदर टोळीने बेकायदेशीर मार्गाने स्वत:साठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींसाठी आर्थिक व इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने संघटीत गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे हिंसाचाराचा वापर करुन किंवा हिंसाचार करण्याची धमकी देवुन किंवा धाकदपटश्या दाखवुन किंवा जुलुम जबरदस्तीने अवैध मार्गाने बेकायदेशीरकृत्य चालु ठेऊन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे संघटीत गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन त्यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करूनही त्यांनी पुन्हा-पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(४) प्रमाणे कलम वाढविण्यासाठी सदर कायद्याचे कलम २३(१)अ अन्वये मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव श्री. संतोष पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बंडगार्डन पोलीस स्टेशन यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ- ०२, पुणे शहर,श्रीमती.स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करून बंडगार्डन पोलीस स्टेशन गु.र.नं.२३२/२०२३ भा.द.वि.कलम ३२६,३२४, ३२३,५०४,५०६,३४ या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील यांनी पुर्व मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त लष्कर विभाग,पुणे शहर श्री.आर.एन.राजे हे करीत आहेत.

सदर कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री. संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ०२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,लष्कर विभाग,पुणे,श्री.आर.एन.राजे यांचे मार्गदर्शनाखाली बंडगार्डन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, गुन्हे,श्रीमती.अश्विनी सातपुते, सहा.पोलीस निरीक्षक,अभिजीत जाधव, पो.उप निरीक्षक,रविंद्र गावडे, पो.उप निरीक्षक,राहुल नळकांडे, पोलीस अंमलदार तळेकर,राणे व घडे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्तपुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व नागरीकां मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ४४ वी कारवाई आहे.**